नाशिक महानगरपालिका, नाशिक
नाट्यगृहे,तारांगण व फाळके स्मारक विभाग
Webmail :manager.auditorium@nmc.gov.in
दुरध्वनी क्रमांक : ०२५३-२२४०१२१

जा.क्र./कालिदास./ १३७ /२०२५ दि. १४/ ०८ /२०२५ NMC/DRT /OWL/२०२५/११८

## आदेश – ०४

विषय – पं.पलुसकर सभागृह येथील सन २०२५-२६ साठी सुधारीत नविन नियमावली तयार करणे बाबत.

संदर्भ – १..मा.आयुक्त तथा प्रशासक सो. नामनपा यांची दि. ०२/०६/२०२५ रोजीची मान्यता
२. मा.महासभा ठराव क्र.११७ दि. १२/०६/२०२५ रोजीची मान्यता

उपरोक्त विषयान्वये पं.पलुसकर सभागृह पंचवटी मनपा हे नागरिकांच्या सोयीसाठी सन १९९८मध्ये पंचवटी सार्वजनिक बांधकाम विभाग पंचवटी यांचे मार्फत नव्याने बांधण्यात आलेले होते.तसेच नागरिकांसाठी सुरु करण्यात आले होते. पं.पलुसकर सभागृहाचे नुतनीकरणाचे काम करण्यात करण्यात आलेले होते तेथील सन २००१ मध्ये नियमावली करण्यात आलेली होती तेव्हा सभागृहाची आसन क्षमता १९० होती तसेच प्लास्टीक चेअर्स होत्या व सदरचे सभागृह हे वातानुकुलील नव्हते. परंतू तदनंतर सदर सभागृहाचे स्मार्टसिटी कं.मनपा यांचेमार्फत दि. ३१/७/२०२२ मध्ये नुतनकीरण करण्यात आलेले आहे. काही तांत्रीक कामे तसेच इतरकामांच्या बाबींची पुर्तता न केल्यामुळे सदरचे सभागृह स्मार्टसिटी कं.यांचेकडून हस्तांतरीत करण्यास अडचणी निर्माण होत होत्या त्यानंतर दि. २०/६/२०२४ रोजी मनपाकडे हस्तांतरीत करण्यात आलेले आहे. नुतनीकरणाअंतर्गत सभागृहात आरामदायी आसन क्षमता १६० करण्यात आलेली असून वातानुकुलीत यंत्रणा, तसेच रंगमंचा आकार वाढविण्यात आलेला आहे. तसेच अत्याधुनीक साऊंड सिस्टिम तसेच इतर यंत्रणा बसविण्यात आलेली आहे. व सदर सभागृहात १ व्हिआयपी रुम व २ मेकअप रुम आहेत.

पं.पलुसकर सभागृह येथील जुन्या नियमावलीत सुधारणा करुन नविन नियमावली तयार करणे बाबतचा प्रस्ताव इकडील विभागाने सादर केला आहे. त्यास मा..आयुक्त तथा प्रशासक सो.नामनपा यांची मान्यता मिळालेली असून पं.पलुसकर सभागृह.येथील नविन नियमावलीस मा.महसभेच्या संदर्भ क्र. २ अन्वये मान्यता मिळालेली आहे..

१. पं.पलुसकर सभागृह मधील विविध कार्यक्रमाचे भाडे/ अनामत आकारणी खालील प्रमाणे राहील

| अ.क्र | कार्यक्रमाची वर्गवारी | प्रस्तावीत दर व वेळ | प्रस्तावीत दर व वेळ | प्रस्तावीत दर व वेळ | प्रस्तावीत दर व वेळ | सुरक्षा अनामत |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सकाळ ८.०० ते ११.०० | प्रथम १२.०० ते ४.०० | व्दितीय ४.३० ते ८.३० | तिसरे ९.३०ते १२.३० | |
| १. | रंगीत तालिम / हौशी बालनाटय / हौशी नाटक / कार्यक्रमाची तयारी | २००० + ५० शोटॅक्स + १८% जिएसटी | २,५०० + ५० शोटॅक्स + १८% जिएसटी | ३,००० + ५० शो टॅक्स + १८% जिएसटी | ३,५०० + ५० शो टॅक्स + १८% जिएसटी | ५,००० |
| २. | व्यावसायिक नाटक / शास्त्रीयगायन / मराठी गाण्यांचा कार्यक्रम/ जादूचे प्रयोग/व्यावसायिक बालनाटय /शास्त्रीय नृत्य | ३००० + ५० शो टॅक्स + १८% जिएसटी | ४,००० + ५० शो टॅक्स +१८% जिएसटी | ५,००० + ५० शो टॅक्स + १८% जिएसटी | ६,००० + ५० शो टॅक्स + १८% जिएसटी | १०,००० |

| अ.क्र | कार्यक्रमाची वर्गवारी | प्रस्तावीत दर व वेळ | प्रस्तावीत दर व वेळ | प्रस्तावीत दर व वेळ | प्रस्तावीत दर व वेळ | सुरक्षा अनामत |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सकाळ ८.०० ते ११.०० | प्रथम १२.०० ते ४.०० | व्दितीय ४.३० ते ८.३० | तिसरे ९.३०ते १२.३० | |
| ३. | ऑर्केस्ट्रा, कार्यशाळा, गजल, कविसंमेलन, व वरील क्र.१ व २ मध्ये समाविष्ट नसलेले अन्यकार्यक्रम / व्याख्यान | ५,००० + ५० शो टॅक्स् + १८% जिएसटी | ६,००० + ५० शो टॅक्स् + १८% जिएसटी | ७,००० + ५० शो टॅक्स् + १८% जिएसटी | ८,००० + ५० शो टॅक्स् + १८% जिएसटी | १०,००० |
| ४ | शासनाचे विविध विभागांतील बैठका / चर्चा / सेमिनार / एकांकिका /नाटय स्पर्धा | १५०० + ५० शो टॅक्स् + १८% जिएसटी | २००० + ५० शो टॅक्स् + १८% जिएसटी | २५०० + ५० शो टॅक्स् + १८% जिएसटी | ३,००० + ५० शो टॅक्स् + १८% जिएसटी | ५,००० |
| ४-ब | शासकीय कार्यक्रम / शासकीय कार्यशाळा / निवडणूक प्रशिक्षण वर्ग इत्यादी | १५०० + ५० शो टॅक्स् + १८% जिएसटी | २०००/- + ५० /- शो टॅक्स् + १८% जिएसटी | २५००/- + ५० /- शो टॅक्स् + १८% जिएसटी | ३,००० + ५० शो टॅक्स् + १८% जिएसटी | ५,००० |
| ५ | शासनाचे विविध विभागांचे नाटक,स्पर्धा व इतर नाटक / शास्त्रीय गायंन / मराठी गाण्यांचा कार्यकम व कार्यशाळा | २००० + ५० शो टॅक्स् + १८% जिएसटी | २,५०० + ५० शो टॅक्स् +१८% जिएसटी | ३००० + ५० शो टॅक्स् + १८% जिएसटी | ३,५०० + ५० शो टॅक्स् + १८% जिएसटी | ५,००० |
| ६ | शासनाच्या विविधं विभागाचे ऑर्केस्ट्रा / गजल व वरिल क्र.१ व क्र.२ मध्ये समाविष्ट नसलेले अन्य कार्यक्रम | २२०० + ५० शो टॅक्स् + १८% जिएसटी | २४०० + ५० शो टॅक्स् + १८% जिएसटी | २६०० + ५० शो टॅक्स् + १८% जिएसटी | २८०० + ५० शो टॅक्स् + १८% जिएसटी | ५,००० |

२. वरील दरांव्यतिरिक्त सुट्टीच्या दिवसांसाठी खालीलप्रमाणे अतिरिक्त शुल्क आकारणेत येईल.

२.१- शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवसांसाठी वरील भाड्यांव्यतिरिक्त अ.क्र १ करिता र. रू ५००/- आणि अ.क्र २ व ३ करिता र.रू १,०००/- अतिरिक्त शुल्क आकारले जाईल. मात्र सर्व प्रकारचे नाटकांना अतिरिक्त शुल्क आकारले जाणार नाही

३. पं.पलुसकर सभागृह मधील कार्यक्रमाचे भाडे व्यतिरिक्त इतर सुविधांचे भाडे आकारणी तक्ता

| अ.क्र | जादा दर तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १. | व्हि.आय.पी.कक्ष | ५००/- |
| २ | प्रती स्पॉट | ५०/- |
| ३ | व्हिडीओ शुटींग प्रती कॅमेरा | ५००/- |
| ४ | एलईडी वॉल १०" x १०" - १ नग व त्यापुढील साईज करीता चे दर र.रु. | ५०० /-<br>१००० /- |
| ५ | जादा वेळ ३० मिनीटाकरीताव त्यापुढील वेळेकरीता पुढील सत्राचे भाडे आकारण्यात येईल. | ५०० /- |

शासकीय कार्यक्रमास १० % सवलत मा. आयुक्त साहेब नामनपा यांचे मान्यतेने देण्यात येईल.

४. पं.पलुसकर सभागृह येथील कार्यक्रमांसाठी सत्र कालावधी खालील प्रमाणे राहील.

| अ.क्र. | सत्राचा तपशिल | सत्राची वेळ |
|---|---|---|
| १ | सकाळ सत्र | सकाळी ८.०० ते ११:०० |
| २. | प्रथम सत्र | दुपारी १२:०० ते ४:०० |
| ३. | दुसरे सत्र | सायं. ४:३० ते रात्री ८:३० |
| ४ | तिसरे सत्र | रात्री. ९ :३० ते रात्री १२:३० |

दिलेल्या सत्राची वेळ यामध्ये कार्यक्रम चालू करण्याची पुर्व तयारी व कार्यक्रम संपल्यानंतर रंगमंच रिकामे करून देण्याची वेळ समाविष्ट करणेत आलेली आहे त्यामुळे कार्यक्रमाचे वेळेपुर्वी व कार्यक्रम संपल्यानंतर उपरोक्त वेळेव्यतिरिक्त अतिरिक्त वेळेची मागणी करू नये. कार्यक्रम, त्याची पुर्व तयारी व कार्यक्रम संपल्यानंतर रंगमंच रिकामे करण्या करीता लागणारी वेळ गृहीत धरून सत्रांचे आरक्षण करावे. गरज पडल्यास एकापेक्षा जास्त सत्रांचे आरक्षण करावे.

५. पं.पलुसकर सभागृह आगाऊ आरक्षणाचा कालावधी खालील प्रमाणे असेल.त्यानंतर उपलब्धते प्रमाणे उर्वरित आरक्षण होईल.

| अ.क्र | तपशिल | आरक्षण चालू करण्याचा दिवस |
|---|---|---|
| १. | एप्रिल ते जुन मधील आगाऊ आरक्षण | १ जानेवारी. |
| २. | जुलै ते सप्टेंबर मधील आगाऊ आरक्षण | १ एप्रिल |
| ३. | ऑक्टो ते डिसेंबर मधील आगाऊ आरक्षण | १ जुलै |
| ४. | जानेवारी ते मार्च मधील आगाऊ आरक्षण | १ ऑक्टोबर |

६. पुर्व आरक्षित आरक्षण रद्द करणे अथवा पुढील तारीख मागणी करणे करीता खालील प्रमाणे भाडे समायोजित व अनामत परतावा करण्यात येईल.

| अ.क्र | परतावा कालावधीचा तपशिल | भाडे परतावा रक्कम टक्केवारी | अनामत रक्कम |
|---|---|---|---|
| १. | कार्यक्रमापुर्वी ३० दिवस अथवा त्यापेक्षा कमी कालावधी मध्ये आरक्षण रद्द केल्यास | निरंक | अनामत रक्कम पुर्ण परत केली जाईल. |
| २. | कार्यक्रमापुर्वी ३१ दिवस ते ६० दिवसांपर्यंत कालावधी मध्ये आरक्षण रद्द केल्यास | ५०% | |
| ३. | कार्यक्रमापुर्वी ६१ दिवस ते ९० दिवसांपर्यंत कालावधी मध्ये आरक्षण रद्द केल्यास | ७५% | |
| ४. | कार्यक्रमापुर्वी ९१ दिवस व त्यापेक्षा जास्त कालावधी मध्ये आरक्षण रद्द केल्यास | १००% | |
| ५. | आरक्षण रद्द चा कालावधी हा पुर्ण दिवसात व दिवसाची सुरुवात ही रात्री १२.०० वाजता धरत जाईल | | |
| ६ | मात्र कुठल्याही सबबीवर भाडे परत मिळणार नाही. | | |

७. पं.पलुसकर सभागृहात १६० आसने आहे.

८. पं.पलुसकर सभागृहा करीता लागू करण्यात आलेल्या भाडयामध्ये रंगमंचावरील साहीत्य,माईक व्यवस्था, इत्यादी मोफत दिले जाईल. तथापि सदर साहित्य, सुविधा इत्यादी. कुठल्याही कारणास्तव उपलब्ध करून देणे शक्य न झाल्यास भाड्यात कुठल्याही प्रकारची सवलत दिली जाणार नाही.

९. पं.पलुसकर सभागृह नियमावलीत दिलेल्या वेळेतच उपलब्ध करून दिले जाईल. ठरवून दिलेल्या वेळेत प्रयोग संपविण्याची जबाबदारी अर्जदारांची राहील. वेळ संपल्यानंतर ३० मिनिटास र.रु.५०० /- याप्रमाणे आकार लागेल मात्र त्यापुढील वेळेकरीता पुढील सत्राचे भाडे आकारले जाईल.

१० अर्जदाराने कार्यक्रमा करीता आरक्षीत अनामत रक्कम व संपूर्ण भाडे भरणे बंधनकारक असेल.ऑफलाईन बुकींग करताना अनामतीसाठी अनामत रक्कमेचा धनादेश कार्यक्रमाचे तारखेचा व नाशिक मनपाच्या नावाने द्यावा तो धनादेश बँकेत जमा न करता व्यवस्थापनाच्या ताब्यात ठेवला जाईल. जादा वुसली अर्जदाराने तीन दिवसाच्या आत रोख स्वरुपात भरलेस सदर धनादेश परत करण्यात येईल.अंन्यथा चौथ्या दिवशी सदर धनादेश मनपाच्या खात्यात जमा केला जाईल.ज्या संस्थेच्या/व्यक्तिच्या नावाने आरक्षण असेल त्या संस्थे वा/व्यक्तिचा चेक अनामत म्हणून स्विकारला जाईल तसेच सदर चेक हा आरक्षणाची तारखेचा असणे गरजेचे आहे.

११. कुठल्याही व्यक्तीने/ संस्थेने केलेले आरक्षण मनपाचे विभाग प्रमुखांच्या परवानगी शिवाय परस्पर अन्य व्यक्तीस / संस्थेस आरक्षण देता येणार नाही.तसे अढळल्यास रु.१०,००० /- दंड आकारणेत येईल व अशा व्यक्तीस / संस्थेस तदनंतर कधीही आरक्षण दिले जाणार नाही.

१२. प्रयोगापूर्वी दोन दिवस आधी सकाळी ९.०० ते १२.०० व दुपारी ५.०० ते ८.०० आणि प्रयोगाच्या दिवशी पूर्णदिवस तिकीट विक्री करता येईल. तिकीट विक्रीचे काम नियमानुसार सुरु आहे किंवा कसे हे पाहण्याच्या अधिकार महापालिका प्रशासनास / व्यवस्थापनास राहील. त्यांनी वेळोवेळी केलेल्या सुचना अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.तसेच आरक्षण नसल्यास बुकींग ऑफीसचा गैरवापर होता कामा नये.

१३. प्रयोगासंदर्भात सर्व कामगार कायदे व शासकीय नियमांचे पालन करणेची जबाबदारी आयोजकांवर राहील कार्यक्रम सुरु होण्यापूर्वी कार्यालयात पोलीस विभागाकडील परफॉरमन्स व ध्वनिक्षेपक परवाना, रंगभूमी परिनिरीक्षण मंडळ प्रमाणपत्र,इतर आवश्यक असलेली शासकीय प्रमाणपत्रे इंत्यादी परवाने दाखविण सक्तीचे आहे.

१४. सुरक्षेची व्यवस्था आयोजकाने स्व खर्चाने करणे आवश्यक आहे. तथापि तातडीच्या प्रसंगी व्यवस्थापनास पोलीस मदत मागविण्याची गरज पडल्यास, त्याचा संपूर्ण खर्च आयोजकास द्यावा लागेल. प्रयोगाच्या वेळेस आपल्याकडील व्दारपाल स्वखर्चाने ठेवावे.

१५. आयोजकास प्रयोगाचे कालावधीत रंगमंच व रंगपट वापरता येईल. तथापि, प्रयोगाच्या वेळी संबंधित व्यक्तीशिवाय अन्य व्यक्तींना प्रवेश दिला जाणार नाही.

१६. प्रयोग कालावधीत महापालिकेने प्राधिकृत केलेले अधिकारी अगर व्यवस्थापक संपुर्ण सभागृहाची तपासणी करु शकतील.

१७. प्रयोग कालावधीत संपुर्ण परिसरात थुंकणे / धुम्रपान करणे/मद्यपान करणे अथवा प्रेक्षागृहात खाद्यपदार्थ, पाण्याच्या / शितपेयाच्या बाटल्या नेण्यास मज्जाव राहील. हयाची जबाबदारी व्दारपाल व पर्यायाने आयोजकावर राहील. तसेच आक्षेपार्ह वर्तन करणाऱ्या प्रेक्षकास प्रेक्षागृहाबाहेर काढण्याचा अधिकार महापालिका प्रशासनास राहील.

१८ परस्पर कार्यक्रम दुसाऱ्या संस्थेस दिल्यास अथवा Booking केलेल्या एखाद्याने अतिरिक्त शुल्क घेऊन कार्यक्रम दिल्यास त्यास Black list केले जाईल.

१९. पं.पलुसकर सभागृहाच्या भाडयामध्ये कुठल्याही प्रकारची सवलत दिली जाणार नाही व तशी मागणी करू नये.

२०. मा.आयुक्त सो. यांचे मान्यतेने कांही अपरिहार्य कारणास्तव आरक्षीत तारीख/ सत्र रद्द करणेचा, तसेच शासकीय अथवा मनपा कार्यक्रमासाठी खाजगी व्यक्ती / संस्थेस दिलेले आरक्षण रद्द करणेचा अधिकार महापालिका प्रशासनास राहील

२१. वेळेवर उद्भवणारी तांत्रिक आपत्ती व नैसर्गिक आपत्ती अथवा कलामंदीरातील तांत्रिक बिघाडामूळे प्रयोग रदद झाल्यास कार्यक्रमाचे भाडे व अनामत पुढील प्रयोगात समायोजित केले जाईल. तथापि, आयोजकांनी कुठल्याही कारणाने प्रयोग रद्द केल्यास अथवा कार्यक्रम पुढे ढकलल्यास / तारीख बदलुन मागीतल्यास भरलेले भाडे रक्कम परत करण्यात येणार नाही अथवा समायोजित केले जाणार नाही मात्र अनामत रक्कम पुर्ण परत करण्यात येईल.तसेच शासकीय विभागाने शासकीय कार्यक्रमासाठी आरक्षण केलेले असल्यास व तो कर्यक्रम काही अपरिहार्य कारणास्त्व रद्द झाल्यास सभागृहाच्या उपलब्धतेप्रमाणे आयोजकांना आरक्षण उपलब्ध करुन दिले जाईल. व रद्द झालेल्या सत्राचे अनामत व भाडे उपलब्ध करुन दिलेल्या सत्राचे दिवशी समायोजित करण्यात येईल.तथापी समायोजित केलेली रक्कम कमी भरल्यास उर्वरित रक्कम आयोजकांना भरणे बंधनकारक राहील

२२ पं.पलुसकर सभागृहाचा कार्यक्रमासाठी वापर झाले नंतर ते स्वच्छ व सुस्थितीत नसेल तर दंड र.रु.१०००/- आकारण्यात येईल.

२३. पं.पलुसकर सभागृहाच्या भिंतीवर, फरशीवर लिहीणे / स्टिकर चिटकवणे अन्यथा कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याबाबत आर्थिक नुकसान भरपाईची रक्कम अनामत रकमेतुन वसुल करण्यात येईल.तसेच नुकसानीची रक्कम अनामत रकमेपेक्षा जास्त झाल्यास ती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये प्राप्त अधिकारानुसार वसुल करणेचा अधिकार मनपास राहील

२४ आयोजित केलेल्या कार्यक्रमासाठी आणलेल्या मौल्यवान वस्तु / वाहन इ.बाबींची सुरक्षेतेची जबाबदारी आयोजकांची/ प्रेक्षकांची राहील त्यास व्यवस्थापन अथवा मनपा प्रशासन कुठल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

२५ पलुसकर सभागृह येथे कुठल्याही सबबीवर जेवण बनविण्यासाठी / खाद्य पदार्थ गरम करण्यासाठी परवानगी दिली जाणार नाही.

२६. या नियमाच्या अर्थाबाबत अगर वापरांबाबत कोणत्याही बाबतीत अर्जदार व महापालिका प्रशासन यांच्य मतभेद झाल्यास त्यासंबंधी महापालिका आयुक्तांचा निर्णय अंतिम राहील.तसेच सदरची नियमावली हि आदेशाचे दिनांकापासुन लागु राहील.

२७. सर्व प्रकारच्या भाडे आकारणी वरील वस्तु व सेवा कर शासनाच्या वेळोवेळीच्या प्रचलित दराप्रमाणे आकारण्यात येईल.

२८ नियमित भाड्यात दर वर्षी ५ ते १० टक्के भाडेवाढ करणेचा अधिकार मनपा प्रशासनास राहील.

२९. सदरच्या नियमात भर टाकणे अगर बदलणे यासाठी कोणतीही पुर्व सुचना न देता नियमात भर टाकणे अगर बदलणेचा अधिकार महानगरपालिका आयुक्तांना आहे.

उपरोक्त प्रमाणे सुधरीत नविन प्रस्तावित नियमावली व भाडे आकारणी करणेस उपरोक्त संदर्भ क्र: २ अन्वये पारित झालेल्या मा. महासभा ठरावा अन्वये मंजुरी देणेत आलेली आहे. त्यानुसार सुधारीत नियमावलीनुसार भाडे दर लागू करण्यात येत आहे.

सदर आदेश मनपाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेस तसेच ऑनलाईन आरक्षण कार्यप्रणालीमध्ये आदेशाप्रमाणे त्वरीत बदल करणेची जबाबदारी माहिती व तंत्रज्ञान विभागाची राहील.

मा.आयुक्त सो.
यांच्या मान्यतेने

उपआयुक्त (मिळकत)
नाशिक महानगरपालिका नाशिक

प्रत माहितीसाठी

१. मा.उपआयुक्त (माहिती व तंत्रज्ञान विभाग)मनपा
२. व्यवसथापक,महाकवि कालिदास कलामंदिर मनपा